एसटीला धडक; दहा जखमी!

कोंढाळीजवळील घटना

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : घाटरोड आगाराच्या बसला कोंढाळी जवळच्या मंगरूळ गावाजवळ विरुद्ध दिशेने येणाऱ्या कंटेनरने सोमवारी दुपारी जोरदार धडक दिली. यात परीक्षा देऊन परतणाऱ्या ४५ पैकी आठ शालेय विद्यार्थी आणि इतर दोघे असे एकूण १० जण जखमी झाले.

एसटी बस व्याहाड ते निमजी फेरी पूर्ण करत असताना दुपारी कोंढाळीजवळच्या मंगरूळ गावासमोर विरुद्ध दिशेने येणाऱ्या मालवाहू कंटेनरने या बसला समोरून धडक दिली. यावेळी बसमध्ये १३ ते १८ वयोगटातील जवळपास ४५ विद्यार्थी होते. चालकाला गंभीर दुखापत झाली. कंटेनर चालकाचे दोन्ही पाय कापले गेले. जखमी विद्यार्थ्यांसह इतरांना व्याहाड पेठ येथे शासकीय रुग्णालयात हलवले. त्यापैकी ४ विद्यार्थी आणि २ विद्यार्थिनींसह एसटी चालकाला नागपुरातील मेडिकल रुग्णालयात हलवण्यात आले. मेडिकल रुग्णालयातून एकूण ८ विद्यार्थ्यांपैकी ५ विद्यार्थ्यांना सुट्टी दिली गेली. गंभीर जखमी चालकाला नातेवाईकांनी खासगी रुग्णालयात हलवले. या प्रकरणाची एसटी प्रशासनाने चौकशी सुरू केली असून अहवालातून अपघाताचे कारण स्पष्ट होईल. या अपघाताच्या वृत्ताला नागपुरातील विभाग नियंत्रकांनी दुजोरा दिला.

विद्यार्थ्यांना धक्का

अपघातातग्रस्त बसमधील विद्यार्थी व्याहाळ आणि मंगरूळ परिसरातील वेगवेगळ्या शाळेतील आहेत. परीक्षा काळात अपघातामुळे बसमधील विद्यार्थ्यांना मानसिक धक्का बसला आहे.

सिंधुदुर्ग-रत्नागिरीची जागा भाजपच लढवणार

गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांचा दावा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : सिंधुदुर्ग-रत्नागिरी ही जागा भाजपच लढवणार, असा दावा गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी केला. नागपुरातील हॉटेल सेंटर पॉईंट येथे सोमवारी ते संपादकांसोबतच्या चर्चेत बोलत होते. सावंत म्हणाले, राज्यातील काही जागांसाठी महायुतीमधील भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या तिन्ही पक्षांकडून रस्सीखेच सुरू आहे. त्यामध्ये सिंधूदुर्ग-रत्नागिरी या जागेचाही समावेश आहे. परंतु ही जागा भाजप लढवणार असून त्याबाबतची घोषणा एक-दोन दिवसांत होणार आहे.

इंडिया आघाडीकडे सध्या ना नेते आहेत, ना नेतृत्व. त्यामुळे मोदी यांच्या हमीवर लोकांचा विश्वास वाढला आहे. काँग्रेसने ५० वर्षांत जे काम केले नाही ते मोदी सरकारने १० वर्षांत करून दाखवले. एक देश, एक निवडणूक हे भाजपचे लक्ष्य आहे. सरकार आल्यावर हा विषय मार्गी लागेल. सध्या कुठेही अंमली पदार्थ सापडल्यास त्याचे तार गोव्याशी जोडले जातात. हे चुकीचे आहे. गोव्यात आमचे सरकार आल्यापासून अवैध काम बंद असल्याचेही त्यांनी सांगितले.

सुप्रिया सुळे काहीही बोलतात

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार गट) नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सलमान खान यांच्या निवासस्थानी झालेल्या गोळीबाराच्या घटनेवर भाष्य करताना सत्ताधारी पक्षावर 'अब की बार गोळीबार सरकार' अशी टीका केली. त्यावर सावंत म्हणाले, सुळे सध्या घरातील भांडणात अडकल्या आहेत. त्यामुळे त्या काहीही वक्तव्य करतात. त्याकडे गांभीर्याने बघण्याची गरज नाही.

सर्वेक्षणात माघारल्याने तुमानेंना संधी नाही

शिवसेनेचे उपनेते वाघमारे यांची माहिती

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : निवडणुकीपूर्वी झालेल्या सर्वेक्षणात तुमाने माघारल्याने त्यांना रामटेकमधील उमेदवारी देण्यात आली नाही, अशी माहिती शिवसेनेचे उपनेते राजू वाघमारे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

राजकीय पक्षांकडून सर्वेक्षण केले जाते. या सर्वेक्षणात कमी गुण मिळणाऱ्यांना बदलले जाते. याच नियमानुसार सर्वच पक्षांनी बऱ्याच ठिकाणी उमेदवार बदलले आहेत, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने मंगळवारी नागपूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्याची माहिती वाघमारे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन दिली. शिंदे यांच्या नरखेड आणि सावनेरमध्ये दोन प्रचारसभा होणार असून यासाठी शिवसेनेचे अन्य नेतेही येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अतिदक्षता विभागात वातानुकूलित यंत्र बंद

पेशंट राईट्स फोरमचा आरोप

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : येथील मेडिकल रुग्णालयातील ट्रामा केअर सेंटरमधील अतिदक्षता विभागातील काही वातानुकूलित यंत्र फेब्रुवारीत बंद पडले. अधिष्ठाता कार्यालयाकडे तक्रारीनंतरही ते सुरू होत नाही. त्यामुळे रुग्णांना उकाड्यात उपचार घ्यावा लागत आहे, असा आरोप पेशंट राईट फोरमने केला आहे.

पेशंट राईट फोरमचे समन्वयक राज खंदारे म्हणाले, गेल्या सहा महिन्यांपासून ट्रॉमा केअर सेंटर येथील अतिदक्षता विभाग १ आणि २ येथील काही वातानुकूलित यंत्र बंद आहे. फेब्रुवारी महिन्यात त्याबाबत पेशंट राईट्स फोरमने अधिष्ठात्यांना भेटून तक्रार दिली. परंतु, अद्यापही सुधारणा झाली नाही. त्यातच गेल्या दोन दिवसांपासून नागपुरात अचानक उकाडा वाढला आहे. त्यामुळे उपचार घेणाऱ्या रुग्णांना उकाड्याचा त्रास होत आहे. अधिष्ठात्यांकडे तक्रारीनंतरही सुधारणा होत नसल्यास आता कुणाकडे तक्रार करावी, असाही प्रश्न राज खंदारे यांनी उपस्थित केला आहे. या विषयावर वैद्यकीय शिक्षण खात्याच्या सचिवांकडे तक्रार केली जाणार असल्याचेही खंदारे यांनी सांगितले.

डॉ. मनोहर तारकुंडे यांचे निधन



लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर: राजनगर येथील रहिवासी डॉ. मनोहर तारकुंडे यांचे निधन झाले. खरे अ‍ॅण्ड तारकुंडे इन्फ्रास्ट्रक्चरचे ते माजी अध्यक्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले व सुना आहेत. उद्या मंगळवारी सकाळी राजनगर येथील घरून त्यांची अंत्ययात्रा निघेल व अंबाझरी घाट येथे सकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

राज्य कर निरीक्षक परीक्षेत अवधूत दरेकर राज्यात प्रथम

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अराजपत्रित गट ब मुख्य परीक्षा २०२३मधील राज्य कर निरीक्षक संवर्गाच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. या परीक्षेत रत्नागिरी जिल्ह्यातील अवधूत दरेकर यांनी राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला.

महिला प्रवर्गातून आश्लेषा जाधव यांनी राज्यात पहिला, तर मागास प्रवर्गातून कोल्हापूरच्या रोहित बेहेरे यांनी पहिला क्रमांक मिळवला.

उच्च शिक्षण विभागाचा संविधानात मोडतोड करण्याचा प्रयत्न

(पान १ वरून) याचिका दाखल करू नये, असा सल्ला देऊनही ती दाखल करण्यात आली. ती न्यायालयाने फेटाळली. उच्च व सर्वोच्च न्यायालयाने धोरणात्मक आदेश देऊनही अद्याप त्याबाबतचा निर्णय अजूनही निर्गमित होऊ नये, ही लाजिरवाणी गोष्ट तर आहेच, पण संविधानातील तरतुदींचा भंग करणारी आहे, अशी टीका देशमुख यांनी केली आहे.

उच्च शिक्षण संचालकांचे आदेश वेगळे, उपसचिवांचे आदेश त्याहून वेगळे आणि दोघांनीही न्यायालयाचा निर्णय वाचलाच नाही. वाचला असल्यास त्यांना तो समजलाच नाही, असे बी.टी. देशमुख यांनी म्हटले आहे. ७१ दिवसांच्या बेकायदेशीर वेतन कपातीच्या प्रकरणात उच्च न्यायालयाने सर्व शिक्षकांचे ७१ दिवसांचे वेतन परत करा आणि त्यावर आठ टक्के व्याज द्या, असे आदेश दिले होते. यावर शासन निर्णयही निघाला, पण उच्च न्यायालयाचा निर्णय आणि राज्य शासनाचा शासन निर्णय आपल्या अधिकारात उच्च शिक्षण संचालकांनी दुरुस्त केला, हे संविधान विरोधी कृत्य असल्याचे देशमुख यांनी म्हटले आहे. एका प्रकरणात तर न्यायालयात खोटी माहिती शपथपत्रासह सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. अशी अनेक उदाहरणे समोर असूनही या अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई केली जात नाही, अशी खंत देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

शब्दकोडे- ३१३

१	२	३	४	■	५	६		७	
■	८			९			■		■
१०			■	११		■	१२	■	१३
१४		■	१५	■	१६				
	■	१७		१८		■		■	
■	१९				■	२०		२१	
२२				■	२३		■		■
■	२४		■	२५			२६		२७
२८		■	२९		■	३०		■	
	■	३१					■	३२	

आडवी विधाने :

(१) प्रचीती, प्रत्यक्ष ज्ञान
(५) मोठ्या शहराजवळची वसाहत
(८) वचन, बोली; लेखी प्रतिज्ञापत्र
(१०) धान्याचा व्यापारी
(११) समेट, समझोता
(१४) अंतःकरण
(१६) स्फुरण घेऊन लढणारा, शूर, उत्साही
(१७) इंधनाचे वा जळाऊ लाकूड
(१९) प्राप्ती, भरभराट
(२०) कठीण, त्रासदायक
(२२) एकान्त, गुप्त मसलत, कारस्थान
(२३) दडपण, वजन
(२४) वारा, वायू
(२५) बारीकसारीक, किरकोळ
(२८) स्तब्धता
(२९) प्रकरण, कलम, मुद्दा
(३०) अभिमान, शेखी, डौल
(३१) पातळसर, घळमळीत
(३२) स्तुतिपाठक

उभी विधाने :

(२) तोटा, हानी
(३) झेप, उड्डाण
(४) नवरा मुलगा
(५) वानगी, नमुना, दाखला
(६) पक्ष्याचा पंख
(७) वेग
(९) अभिप्राय
(१०) लोकवार्ता, अफवा
(१२) गुंतागुंत, घोटाळा
(१३) मर्यादा, अंत, शेवट
(१५) आक्षेप, विरोध, मज्जाव
(१७) लिंबूरसात पाणी, साखर, मीठ वगैरे घालून केलेले घरगुती पेय
(१८) प्रतिष्ठा, वजन
(१९) ताकदवान, शक्तिमान, बलिष्ठ
(२०) ख्यालीखुशाली, हालहवाल
(२१) गोणपाट, बारदान
(२३) गडद, घट्ट
(२५) कारण, निमित्त
(२६) नागाची फडा
(२७) घोड्यावरून मारलेला फेरफटका
(२८) गंमत, मजा
(२९) बंदुकीचा आवाज, धमाका

– सरोज ताठरे

सुडोकू - ३१३

								४
			१			२		६
		१	९	६				
	४		७		३	१		२
	१						७	
७		५	४		८		३	
				५	४	८		
१		३			९			
५								

सुडोकू - ३१२चे उत्तर

८	५	७	६	९	१	४	३	२
६	१	३	४	७	२	८	९	५
४	२	९	३	८	५	७	६	१
९	३	८	२	४	६	५	१	७
७	४	५	९	१	३	६	२	८
१	६	२	८	५	७	३	४	९
२	७	६	५	३	९	१	८	४
५	९	४	१	६	८	२	७	३
३	८	१	७	२	४	९	५	६

शब्दकोडे -३१२चे उत्तर

ज्या	ख्या	न	■	श	हा	नि	शा	■	शू
प	ती	■	अं	त	र	■	ख्या	प	र
क	■	म	■	पा	■	अ	मृ	त	■
■	म	न	क	व	डा	■	ग	■	वि
भ	का	स	■	ळी	■	ह	■	उ	मा
ला	■	ब	ळ	■	क	ल	म	दा	न
म	लि	दा	■	पा	र	ध	■	र	■
ण	■	र	ज	त	■	र	च	■	व
■	मो	■	का	क	वी	■	त	मा	म
ह	र	क	त	■	ज	त	न	■	न

मा. ऋण वसूली न्यायाधिकरण, नागपूर

'बी' ब्लॉक दुसरा माळा, सीजीओ कॉम्प्लेक्स, सेमिनरी हिल्स, नागपूर-440006

ओ.ए. 247/2023 एफ.एफ. 29/05/2024

स्टेट बँक ऑफ इंडिया
- विरूध्द -
शिवशंकर आझाद आणि इतर

प्रतिवादी : 2 : श्री. चंद्रशेखर S/o शिवशंकर आझाद
वयः प्रमुख, व्यवसायः व्यवसाय,
R/o: किल्ला वार्ड, हनुमान मंदिराजवळ,
बल्लारपूर-442701 - जिल्हा. चंद्रपूर

3 : श्री. भगतसिंग S/o शिवशंकर आझाद
वयः प्रमुख, व्यवसायः व्यवसाय,
R/o: किल्ला वार्ड, हनुमान मंदिराजवळ,
बल्लारपूर-442701 - जिल्हा. चंद्रपूर

वर्तमानपत्र प्रकाशनाद्वारे सूचना

1. ज्याअर्थी उपरोक्त नामांकित अर्जदार / अपीलकर्त्याने या न्यायाधिकरणात वरील संदर्भित अर्ज / अपील दाखल केला आहे.
2. ज्याअर्थी समन्स / सूचनेची सेवा सामान्य पद्धतीने लागू करता आली नाही आणि ज्याअर्थी अर्ज प्रतिस्थापित सेवेसाठी या न्यायाधिकरणाने परवानगी दिली आहे
3. तुम्हाला व्यक्तिशः किंवा तुमच्या वकिलामार्फत दि. 29/05/2024 रोजी सकाळी 10.30 वाजता या न्यायाधिकरणासमोर हजर राहून प्रार्थना केलेल्या सवलती का देऊ नयेत याचे कारण विधान लिखित स्वरूपात फाइल करण्याचे निर्देश दिले आहेत.
4. हे लक्षात घ्या की, जर यात चूक झाल्यास, अर्ज / अपीलवर तुमच्या अनुपस्थितीत सुनावणी केली जाईल आणि त्यावर निर्णय घेतला जाईल.

दि. 21.03.2024 रोजी नागपूर येथे माझ्या सहीनिशी न्यायाधिकरणाचा शिक्का दिला आहे.

शिक्का

सहायक पंजियक
ऋण वसुली अधिकरण
नागपूर.

मा. ऋण वसूली न्यायाधिकरण, नागपूर

'बी' ब्लॉक दुसरा माळा, सीजीओ कॉम्प्लेक्स, सेमिनरी हिल्स, नागपूर-४४०००६

ओ.ए. ३१२/२०२२ F.F. ०१/०७/२०२४

स्टेट बँक ऑफ इंडिया
विरुद्ध
राजू रेवेली आणि इतर

प्रतिवादी
१) श्री. राजू S/o रामालू रेवेली
वय सुमारे : ५४, व्यवसाय : सेवा
वेस्टर्न कोलफिल्डस् लिमिटेडसोबत काम करत आहे
रा. क्वार्टर नं. ३३/२, डब्ल्यूसीएल कॉलनी,
टिळक वार्ड, बल्लारपूर-४४२४०१

२) श्रीमती ममता W/o राजू रेवेली
वय सुमारे : प्रमुख, व्यवसाय : गृहीणी
रा. क्वार्टर नं. ३३/२, डब्ल्यूसीएल कॉलनी,
टिळक वार्ड, बल्लारपूर-४४२४०१

३) श्री. प्रशांत सुधाकरराव कशेट्टीवार
ड्यूएल कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून
वय सुमारे : ४५ वर्षे, व्यवसाय : व्यवसाय
रा. बाजार वार्ड, देना बँकेजवळ,
ता. व जिल्हा चंद्रपूर

४) वेस्टर्न कोलफिल्डस् लिमिटेड
येथे त्याचे मुख्यालय आहे
दूध योजनेजवळ, सिव्हिल लाईन्स,
नागपूर-४४०००१ मार्फत
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

वर्तमानपत्र प्रकाशनाद्वारे सूचना

१. ज्याअर्थी उपरोक्त नामांकित अर्जदार/अपीलकर्त्याने या न्यायाधिकरणात वरील संदर्भित अर्ज / अपील दाखल केला आहे.
२. ज्याअर्थी समन्स/सूचनेची सेवा सामान्य पद्धतीने लागू करता आली नाही आणि ज्याअर्थी अर्ज प्रतिस्थापित सेवेसाठी या न्यायाधिकरणाने परवानगी दिली आहे.
३. तुम्हाला व्यक्तिशः किंवा तुमच्या वकिलामार्फत **दि.०१/०७/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता** या न्यायाधिकरणासमोर हजर राहून प्रार्थना केलेल्या सवलती का देऊ नयेत याचे कारण विधान लिखित स्वरूपात फाईल करण्याचे निर्देश दिले आहेत.
४. हे लक्षात घ्या की, जर यात चूक झाल्यास अर्ज/अपीलवर तुमच्या अनुपस्थितीत सुनावणी केली जाईल आणि त्यावर निर्णय घेतला जाईल.

दि. ०६/०४/२०२४ रोजी नागपूर येथे माझ्या सहीनिशी न्यायाधिकरणाचा शिक्का दिला आहे.

शिक्का

आर्यन कुमार
सहायक पंजियक
ऋण वसूली न्यायाधिकरण, नागपूर

मत्तेची ऑनलाइन ई-लिलाव विक्री

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः 27 बीकेसी, सी 27, जी-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई, महाराष्ट्र, पिन कोड -400051 **शाखा कार्यालयः** कोटक महिंद्रा बँक लि., वेद सॉलिटेअर बिल्डिंग, सहावा मजला, शिवाजी नगर, सीमेंट रोड, शिवाजी नगर, नागपूर- 440010

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) मधील तरतुदीसह वाचण्यात येणारया नियम 8(5) अंतर्गत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अ‍ॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्व लोकांना आणि विशेषकरून कर्जदार आणि जामीनदाराला याद्वारे सूचित करण्यात येते की सुरक्षित धनको कडे तारण / भारग्रस्त असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तेचा ताबा दि. 30.12.2023 रोजी कर्जदाराने स्वतः **केएमबीएल** च्या प्राधिकृत अधिकार्यांकडे सुपूर्द केला असून **पीएचएफएल** यांचेकडून कोटक महिंद्रा बँक लिमिटेड यांनी कर्ज अभिहस्तांकीत केले असून सदर मालमत्तेचा ''जेथे आहे जसे आहे'', ''जेथे आहे जे काही आहे'', आणि ''तेथे जे काही आहे'' या तत्वावर सुरक्षित धनको केएमबीएल यांचे **श्री. जावेद रफीक खान, श्री. आबिद रफीक शेख** यांचेकडे देय असलेल्या **कर्ज खाते क्र. HM/0103/H/16/100116** साठी 12.04.2024 रोजी रु. 25,10,970/- (रुपये पंचवीस लक्ष दहा हजार नऊशे सत्तर फक्त) अधिक 13.04.2024 पासून खर्च व शुल्कांसह पूर्ण परतफेड करेपर्यंतचे लागू असलेल्या पुढील व्याजासह इतक्या रकमेच्या वसूलीसाठी **07.05.2024 रोजी दु. 12.00 ते दु. 01.00 पर्यंत प्रत्येकी 5 मिनिटांच्या अमार्याद काल** विस्तारासहविक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत रु. 11,00,000/- (रुपये अकरा लक्ष फक्त) आणि बयाणा रक्कम रु. 1,10,000/- (रुपये एक लक्ष दहा हजार फक्त) आणि केवायसी सह बयाणा रक्कम जमा करण्याचा शेवटचा दिनांक 06.05.2024 रोजी सायं 6.00 (भा.प्र.वे) पर्यंत आहे. **मालमत्तेचे वर्णनः** जमीन प्लॉट क्र. 9सी, क्षेत्रफळ सुमारे 59.85 चौ.मी., डुप्लेक्स घर क्र. 9सी, बिल्ट-अप क्षेत्रफळ 59.94 चौ.मी., सर्वे क्र. 145/2, मौजा भिलगाव, प.ह.क्र. 15, ग्रामपंचायत भिलगाव, तहसील कामठी, जिल्हा नागपूर. चतुःसीमाः उत्तरेस- प्लॉट क्र. 09 (ए), दक्षिणेस- प्लॉट क्र. 10(ए), पूर्वेस- 9 मी. रुंद रस्ता, पश्चिमेस- प्लॉट क्र. 09(बी)

अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग 8 कडे वेधण्यात येते.

कर्जदार आणि सर्व लोकांनी लक्षात घ्यावे की कुठल्याही कारणास्तव सदर लिलाव अयशस्वी झाल्यास सुरक्षित धनकोस खाजगी तहाद्वारे अनामतीवर कारवाई करण्याचा अधिकार असेल.

विक्रीसाठी काढण्यात आलेल्या मत्तांच्या संदर्भात काही खुलासा/आवश्यकता असल्यास बोलीदारांनी कृपया **श्री. निलेश देसाई (+91 9822501623) (+919152219751), श्री. रविंदर गोदरा (+919983999074), श्री. राजेंद्र दहिया (+91 8448264515)** यांचेशी संपर्क साधावा. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया कोटक महिंद्रा बँक लिमिटेड च्या वेबसाईटवर म्हणजे **www.kotak.com** आणि/किंवा **https://bankauctions.in/** वर दिलेली **https://www.kotak.com/en/bank-auctions.html** ही लिंक पाहावी.

स्थानः नागपूर, दिनांकः 16.04.2024 **प्राधिकृत अधिकारीः कोटक महिंद्रा बँक लि. करिता,**

मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः मोतीलाल ओस्वाल टॉवर, रहिमतुल्ला सयानी मार्ग, परळ एसटी डेपोसमोर, प्रभादेवी, मुंबई-400 025. सीएसः 8291889898
वेबसाईटः www.motilaloswalhf.com ईमेलः hfquery@motilaloswal.com

ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(1) अंतर्गत)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड(पूर्वीची अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लि.) चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अ‍ॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद कर्जदारांना एक मागणी सूचना निर्गमित केली ज्यात त्यांना सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत सूचनेत नमूद रकमेची परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार/जामीनदारांना व सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेन्ट रुल्स, 2002 च्या नियम 8 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली नमूद मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे.

अ. क्र.	कर्ज करार क्र. / कर्जदार/सह-कर्जदार / जामीनदाराचे नाव	मागणी सूचना दिनांक व थकबाकी	ताबा घेण्याचा दिनांक	तारण मालमत्तेचे वर्णन
1	LXWAS00317-180056596 मुरलीधर दत्तूजी लांडकर आणि लक्ष्मीबाई मुरलीधर लांडकर	19-08-2023 रु. 257433/- करिता	10-04-2024	घर क्र. 135, जि.प. शाळेजवळ, किनखेडा, पीओ. कारळी, तह. जिल्हा वाशिम, जि.प. शाळेजवळ, 444505, वाशिम, महाराष्ट्र

याद्वारे कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सावधगिरीची सूचना देण्यात येते की सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड यांच्या वर नमूद रकमेच्या व त्यावरील व्याज एवढ्या रकमेच्या भाराधीन असेल.

अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमाच्या अनुच्छेद 13 च्या उप-विभाग (8) मधील तरतुदींकडे वेधण्यात येते.

स्थानः महाराष्ट्र
दिनांकः 16.04.2024

स्वा/-
प्राधिकृत अधिकारी
(मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड)

भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालयः ''चोला क्रेस्ट'', सी 54व 55, सुपर बी-4, थिरू वी का इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई-600032
शाखा कार्यालयः प्लॉट क्र. 12, तिसरा मजला, एलअँडटी बिल्डींग, वोक्हार्ट हॉस्पिटलसमोर, कारण कोठरी ज्वेलर्स च्या शेजारी, शंकर नगर, नागपूर- 440010

ताबा सूचना

[नियम 8(1)] (अचल मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल अ‍ॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम 3 सह वाचण्यात येणारया अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत 15-07-2023 रोजी आपले **कर्ज खाते क्र. HE01NAG00000024798** च्या संदर्भात एक मागणी सूचना पाठवली ज्यात **कर्जदार 1. हेमंत अर्जुनदास ठुठेजा, 2. शिवशक्ती क्लॉथ स्टोर्स, 3. अर्जुन कुंदनदास ठुठेजा, 4. बिमला अर्जुनदास ठुठेजा,** सर्व राहणारः सदनिका क्र. 402, एंजल पॅराडाईज, तुलसी नगर, शांती नगर जवळ, कला माता मंदिराजवळ, नागपूर, महाराष्ट्र - 440002 यांना सदर सूचनेत नमूद दि. 07-07-2023 रोजीची रक्कम **रु. 45,52,129/- (रुपये पंचेचाळीस लक्ष बावन्न हजार एकशे एकोणतीस फक्त)** चा तीवरील व्याजासह सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदार सदर रकमेची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने कर्जदार व सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी **माननीय मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांनी प्रकरण क्र. Cri. M.A. No. 5427/2023 मध्ये** पारित केलेल्या **दि. 11-03-2024 रोजीच्या आदेशान्वये सदर मालमत्तेचा दि. 12-04-2024 रोजी प्रत्यक्ष ताबा** घेतलेला आहे.

सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदाराचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) कडे वेधण्यात येते.

याद्वारे कर्जदार व सर्वसामान्य जनतेस सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड च्या दि. 07-07-2023 रोजीची रक्कम **रु. 45,52,129/- (रुपये पंचेचाळीस लक्ष बावन्न हजार एकशे एकोणतीस फक्त)**आणि तीवरील व्याजाच्या भाराधीन असेल.

अचल मालमत्तेचे वर्णनः- आरसीसी बांधकाम असलेले दुकान क्र. जीएफ-13, बिल्ट-अप क्षेत्रफळ सुमारे 30.860 चौ.मी. (म्हणजे 332.17 चौ.फू.), सोबत एकूण सुमारे 1490.15 चौ.मी. (म्हणजे 16040.00 चौ.फू.) क्षेत्रफळ असलेल्या नासुप्र लीझहोल्ड प्लॉट क्र. 353 मधील 1.063% हिस्सा व हितसंबंध, नासुप्र ची इस्टर्न इंडस्ट्रीयल एरिया स्ट्रीट स्कीम, खसरा क्र. 75, मौजा चिखली (देवस्थान), सिटी सर्वे क्र. 395, शीट क्र. 70, महापालिका घर क्र. 1253/353/13, वॉर्ड क्र. 22, नासुप्र व नामपा च्या हद्दीत, नागपूर, ता. व जि. नागपूर आणि **चतुःसीमाः पूर्वेस-** प्लॉट क्र. 352, **पश्चिमेस-** रस्ता, **उत्तरेस-** रस्ता आणि प्लॉट क्र. 315, **दक्षिणेस-** भंडारा रोड.

दिनांकः 16-04-2024
स्थानः नागपूर

स्वा/- प्राधिकृत अधिकारी,
मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड

जाहिर सुचना

कार्यालय : उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर (शहर-२)

सदहू जाहिर सुचनेद्वारे आपणास कळविण्यात येते की, निम्नलिखीत थकबाकिदारांकडील कर्ज वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अंतर्गत वसुली दाखला मिळणे करीता **दि यवतमाळ अर्बन को-ऑप. बँक लि. शाखा : गांधीबाग, नागपूर** या बँकेने या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे. या संदर्भात या कार्यालयामार्फत थकबाकीदारांना नैसर्गिक न्याया या तत्वानुसार त्यांचे म्हणणे मांडण्याकरीता पुरेपुर संधी देण्यात आलेली आहे. तरी देखील निम्नलिखीत कर्जदार/जमानतदार या कार्यालयातर्फे आयोजीत करण्यात आलेल्या सुनावणीस उपस्थित राहीलेले नाहीत.

सदहू जाहिर सुचनेद्वारे निम्नलिखीत थकबाकिदारांना अंतिम सुनावणीची संधी देण्यात येत आहे. या बाबत त्यांचे म्हणणे मांडावयाचे असल्यास समक्ष अथवा त्यांचे प्रतिनिधीमार्फत **दिनांक ०३/०५/२०२४ दुपारी ३.०० वाजता** निम्नलिखीत कार्यालयात हजर रहावे. सदर तारखेस उपस्थित न राहिल्यास त्यांना त्यांचे थकबाकी संदर्भात काहीही म्हणणे मांडावयाची नाही असे समजुन वसुली दाखला निर्गमित करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि यवतमाळ अर्बन को-ऑप. बँक लि. शाखा : गांधीबाग, नागपूर

क्र.	केस क्र.	थकीत कर्जदाराचे नाव व पत्ता	दावा रक्कम
१	४७६/२०२३	**१) सौ. प्रिया संजय मेश्राम (कर्जदार)** प्लॉट नं. ७२ सुमेध नगर, कबीर नगर, नारी रोड, उप्पलवाडी नागपूर ४४००२६ **२) सौ. नीता नितेश फातोडे (जामीनदार)** प्लॉट नं. २५०, सुगत नगर, नारी रोड, उप्पलवाडी नागपूर **३) सौ. अर्चना दिलीप मोरे (जामीनदार)** ३२१, तिसरा मजला, राई विहार अपार्टमेंट, नारी रोड सुगत नगर नागपूर ४४००२६	३३,४३२/-
२	४७५/२०२३	**१) सौ. नीता नितेश फातोडे (कर्जदार)** प्लॉट नं. २५०, सुगत नगर, नारी रोड, उप्पलवाडी नागपूर ४४००२६ **२) सौ. प्रिया संजय मेश्राम (जामीनदार)** प्लॉट नं.७२,सुमेध नगर, कबीर नगर, नारी रोड, उप्पलवाडी नागपूर **३) सौ. अर्चना दिलीप मोरे (जामीनदार)** ३२१, तिसरा मजला, राई विहार अपार्टमेंट, नारी रोड, सुगत नगर नागपूर ४४००२६	५८,०३६/-
३	४७७/२०२३	**१) सौ. अर्चना दिलीप मोरे (कर्जदार)** ३२१, तिसरा मजला, राई विहार अपार्टमेंट, नारी रोड, सुगत नगर नागपूर ४४००२६ **२) सौ. नीता नितेश फातोडे (जामीनदार)** प्लॉट नं. २५०, सुगत नगर, नारी रोड, उप्पलवाडी नागपूर ४४००२६ **३) सौ. प्रिया संजय मेश्राम (जामीनदार)** प्लॉट नं. ७२, सुमेध नगर, कबीर नगर, नारी रोड, उप्पलवाडी, नागपूर ४४००२६	२८,३४९/-
४	१०६/२०२४	**१) सौ. साधना दिनेश वराडे (कर्जदार)** प्लॉट नं.३६, काळे ले-ऑउट, झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड नागपूर **२) श्रीमती सपना प्रवीण धनवजीर (जामीनदार)** १३ अ, गांधी ले-ऑउट जाफर नगर, काटोल रोड, नागपूर १३ **३) श्री. दिनेश दत्तात्रय वराडे (जामीनदार)** प्लॉट नं. ३६, काळे ले-ऑउट, झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड, नागपूर ४४००३०	८०,५१९/-
५	१०७/२०२४	**१) श्री. लक्ष्मण उपसराव पोटे (कर्जदार)** लालगंज मेहन्दिबाग रोड, जावेद सायकल स्टोर्स, नागपूर ४४०००२ **२) श्री. रवींद्र विश्वेश्वर कापसे (जामीनदार)** जी.९५ वेलकम होम अपार्टमेंट, गोरपेठ शंकर नगर, नागपूर ४४१११० **३) श्री. आनंद केवळराम चुरड (जामीनदार)** प्लॉट नं.१९६, गजानन मंदिर जवळ, न्यू सुभेदार ले-ऑउट एन.आय.टी. गार्डन समोर, नागपूर ४४००२४	१३,०९,३३६/-

कार्यालय : उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-२
पत्ता : भुविकास बँक कॉम्प्लेक्स, पहीला माळा,
गणेशपेठ पोलीस स्टेशन समोर, गणेशपेठ, नागपूर ३२
ठिकाण : नागपूर
दिनांक : १५/०४/२०२४

उपनिबंधक
सहकारी संस्था,
नागपूर (शहर-२)